। न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळ वडूजचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

ता. खटाव जि.सातारा



## विषय – भाषाशास्त्र

प्रकल्प विषय – तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही कादंबरीचे,कवीता संग्रहाचे रसग्रहण करा

बी. ए. भाग –३

गटप्रमुख : निकम मोनिका दत्तात्रय

सदस्य : जाधव कोमल जंबू

फडतरे अश्विनी धनाजी

माळी रूपाली प्रकाश

भोसले वर्षाराणी सुरेश

फडतरे करूणा वसंत

मार्गदर्शक शिक्षक

प्रा. डॉ. सौ. सविता केंजळे

कला व वाणिज्य महाविद्यालय,

वडूज, ता. खटाव

सन २०१६–१७

Scanned with CamScanner

आऊटहाऊसमधील खोली.
वेळ संध्याकाळची
भिंतीलगत असलेल्या कॉटवर कावेली पडलेली आहे.
अप्पा एका जुन्या अवजड आरामखुर्चीवर बसून ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायातील काही ओव्या मोठ्याने वाचून दाखवीत आहेत.
चार पाच ओव्या खालील अर्थासह वाचून झाल्यावर
कावेरी : ऐकलंत का?
अप्पा : काय म्हणता, सरकार?
कावेरी : किती वाजले असतील?
अप्पा : कुणास ठाऊक ! माझं घड्याळ हरवल्यापासून हा प्रश्न कायमचा बाद झाला आहे. आता फक्त दिवसांचा हिशेब, तासांचा नाही. (चष्मा चढवून पुन्हा पुढे वाचू लागतात.) तो म्हणे अवधारी देवा। म्यां पाहिला हा मेळावा। तव गोत्रवर्ग आघवा। देखला येथ।। तेव्हा अर्जुन म्हणाला, कृष्णा, मी काय म्हणतो तिकडे लक्ष दे –
कावेरी : ऐकलतं का?
अप्पा : (चष्मा काढून) आता काय?
कावेरी : आज इतकंच पुरे. माझं नाही लक्ष लागत.
अप्पा : (पुस्तक दूर ठेवून) ठीक आहे. आपलं वर्तन सुधारावं म्हणून सर्वांनी संगन मत करून हा ग्रंथ आपल्याकडे पाठविला. पण पहिला अध्याय काही अजून संपत नाही. काय म्हणणं आहे आपलं, सरकार?
कावेरी : हसणार नसाल तर सांगते.
अप्पा : नाही हसणार.
कावेरी : मला किनई आज खूप बरं वाटतयं.
अप्पा : वाटलं तरी असं बोलायचं नसतं. सैतानाची पिल्लं वळचणीला बसलेली असतात. ती ऐकतात.
कावेरी : ऐकू दे, देवाची पिल्लही दुसऱ्या वळचणीला बसलेली असतात.

Scanned with CamScanner

अप्पा : बरं मग आपण दोघांनी फिरायला जायचं का हातात हात घालून – एखाद्या बागेमध्ये ?

कावेरी : इश्श! चेष्टा केलीत तर मी बोलणार नाही.

अप्पा : (उठतात) काय गाढव आहे मी? आता बाग म्हटल्यावरून आठवण झाली. सरकार, आज मी तुमच्यासाठी एक गंमत आणली आहे, मघाशी बाहेरून आलो तेव्हा (खुंटीवरचा कोट चाचपू लागतात.)

कावेरी : काय आणलंय्?

अप्पा : ओळखा बघू.

कावेरी : भजी नाहीत ना? पुन्हा त्या दिवसासारखं रामायण व्हायचं.

अप्पा : खाण्यात जमा नाही.

कावेरी : ओळखलं, सोनचाफ्याची फुलं.

अप्पा : (कॉटकडे येत) भामटी, कसं ओळखलं तू?

कावेरी : (हसून) अहो, सोनचाफ्याची फुलं कधी लपून राहतात का? तुम्ही आल्यापासून सुवास दरवळतो आहे साऱ्या खोलीमध्ये. या वाचण्यात मी विसरून गेले होते.

कावेरी : (सुखावून) इश्श! काय बोलण हे ! हातात द्या माझ्या. (फुल घेतं) किती छान आहेत! कुणाच्या बागेवर डल्ला मारला?

अप्पा : अगं बाग कोणाचीही असली तरी फुलं देवाची असतात. प्रत्येक फुलाच्या प्रत्येक पाकळीवर परमेश्वरानं सही केलेली असते. आकाशातील नक्षत्राप्रमाणेच ही देवाघरची दौलत आहे. तो बागेचा मालक अंगावर धावून आला तेव्हा त्याला मी हेच सांगितलं. म्हटल बाबारे, एखाद्याला त्याच्या गच्चीवर व्याधाची चांदणी उगवलेली दिसली म्हणून ती त्याच्या बापाची मालमत्ता होत नाही.

कावेरी : (हसते) मग त्याला पटलं का ते?

अप्पा : नाही पटलं. त्याला शेवटी एकच पटलं, की मी कालेकरसाहेबांचा सासरा आहे. लोकांना क्षुद्र गोष्टी पटतात, मोठ्या पटत नाहीत.

कावेरी : ते जाऊ द्या. इथं माझ्याजवळ बसा पाहू.

Scanned with CamScanner

अप्पा : काय म्हणणं आहे ? (कॉटवर बसतात)

कावेरी : चार दिवस एक विचार माझ्या मनात येतोय. आज सांगून टाकते.

अप्पा : कसला विचार?

कावेरी : आपण आता इथं राहू नये असं वाटतंय मला.

अप्पा : आणि कुठं जायचं?

कावेरी : आपण आपल्या गावी जाऊन राहू. मोरवाडीला.

अप्पा : इथं त्रास होतोय तुला कावेरी?

कावेरी : तुम्हाला कळत नाही का?

अप्पा : कळतं आहे. या अडगळघरात आपले बाडबिछाने आले तेव्हाच सगळं स्पष्ट झालं. पण ही पोरं सभ्य आहेत. वाजवीपेक्षा जास्त सभ्य आहेत. मनात काहीही असलं तरी ती बाहेर बोलत नाहीत. त्याचा फायदा घेऊन आपणही आपल्याला काही कळत नाही असं दाखवावं आणि हाताला लागेल ती फांदी धरून लोंबकळत राहावं. यातच शहाणपण आहे.

कावेरी : नको. या अवस्थेत माझी तब्बेत कधी सुधारायची नाही.

अप्पा : आणि वाडीला सुधारेल ? तिथं असा मोठा डॉक्टर पाहायला सुध्दा मिळायचा नाही.

कावेरी : न मिळो, कपडयात शिरलेल्या कुसळासारखे आपण झालो आहोत. कुसलाचा काटा होण्याअगोदर आपणच शहापणानं बाहेर पडावं. नव्याचे नऊ दिवस केव्हाच संपून गेले. आता पहिल्यासारखं एकत्र बसणं नाही, बोलण नाही, थट्टामस्करी तर नाहीच, पण रागावणं देखील नाही. चार चार दिवसांत दर्शनसुध्दा होत नाही कुणाच.

अप्पा : कामं असतात त्यांना सरकार. आपल्यासारखी रिकामी नाहीत ती. काटीची किती धडपड चाललेली असते सकाळपासून आणि जावयांच्या डोक्यावर तर डोंगराचं ओझं आहे. नेहमीची कामं अन् पाहुण्यांची वर्दळ. थोडं दुर्लक्ष झालं तर आपणही सांभाळून घ्यावला हवं.

कावेरी : मला हे कळत नाही का? पण मला वाटतं, बाह्यात्कारी सगळ बरं आहे

Scanned with CamScanner

तो पर्यंत आपण दूर व्हावं. आपणही अंत पाहू नये त्याचा. आपण दूर झालो, वाडीला जाऊन राहिलो तर त्यांच्या मायेला पारखं होण्याचा प्रसंग यायचा नाही. प्रेम टिकायला देखील माणसं जरा दूरच असावी लागतात.

अप्पा : (उठतात) ठीक आहे, सरकार. तुमचं म्हणणं बरोबर आहे. खरं सांगायचं तर माझ्याच मनातलं बोललात तुम्ही. आपण वाडीला गेलो तर सगळ्या गोष्टी सुरळीत आणि सुखाच्या होतील. नली–माझ कोकरू– नाचत बागडत येईल माहेरी आपल्याकड. तिच्या त्या साहेबी कारट्यांना मोरवाडीच्या नदीत चांगलं बुचकळून काढीन मी आणि –आणि– मग नंदा शारदाही येतील तिथं माझ्या ठमीला घेऊन. माझ्या मनातून, सरकार ठमी जातच नाही. दिवसरात्र हाका मारीत असते. पण आपण कुणावरही रागवायचं नाही. झालं ते झालं. सगळी पोरंसोरं आली ना सरकार, म्हणजे रोज संध्याकाळी आपण शेलारच्या आमराईत जात जाऊ. चांदण्यात अंगणामध्ये जेवायला बसत जाऊ. मान्य आहे, सरकार, मान्य आहे. आपण पोरीला माहेर द्यायला हवं, नातवंडांना आजोळ द्यायला हवं, मुख्य म्हणजे काही तरी द्यायला हवं, नुसतं घेण्याचा सोस बंद करून. सरकार आपलंच चुकतं. भूतकाळाच्या डोहात पाय टाकून बसलेली वडाची झाडं होतो आपण. भुताटकी एकान्ताचा डेरा घालून बसणारी, भोवतालची हवाच नव्हे तर नदीचं पाणीही स्वार्थाच्या घनदाय सावलीनं काजळून टाकणारी, वडाची जुनाट झाडं. यातून आपण बाहेर पडायला हवं. बस, ठरलं. वाडीला जायचं. नशीब की वाडीतलं घरटं आपण कुणाला देऊन टाकलं नाही. पण आता त्याची काय दशा झाली असेल, कुणास ठाऊक!

कावेरी : त्याची काळजी नको. हे घर सुटलं ना, की माझी बिछानाही सुटेल, मी माझ्या हातानं भिंती लिंपून काढीन, जमीन सारवीन, रंगदेखील मीच देईन. एकदा कमरेला पदर बांधला की, खोपट्याचाही राजमहाल करीन मी. आपण मात्र मधेमधे लुडबुड करायची नाही, की माझ्या अंगावर ओरडायचं नाही. आधीच सांगून ठेवते.

अप्पा : सांगितलंस ते बरं केलंस. तिथं जाईपर्यंत लक्षात रहायला हवं. एवढंच.

Scanned with CamScanner

कावेरी : आणि गडे –
अप्पा : गडे?
कावेरी : इश्श ! येतं तोंडात एखादे वेळी.
अप्पा : येऊ दे की, त्यात एवढं कासावीस कशाला व्हायला हवं? तापलेल्या अंगावर गुलाबपाणी शिंपडल्यासारखं वाटतं. काय म्हणत होतीस?
कावेरी : म्हटलं, माझी फार वर्षापूर्वी आपली एक हौस आहे. मागच्या अंगणाला आपण चांगलं कुंपण करू आणि तिथं एक तुळशीवृंदावन बांधून देऊ.
अप्पा : तथास्तु !
कावेरी : हार विकला त्याचे दीड हजार रूपये आहेत अजून आपल्याजवळ
अप्पा : कुठ आहेत ते? माझ्या लक्षातच नाही.
कावेरी : कॉटच्या खाली, माझ्या ट्रंकेत आहेत. शिवाय पाटल्या आहेत. चार बांगड्या आहेत. दोन अंगठ्या आहेत. आपण सगळं मोडू आणि एक लहानसं शेत विकत घेऊ.
अप्पा : एक शेत आहे अजून.
कावेरी : मग शेतीची अवजारं घेऊ, बैल घेऊ. आणि मग – मग–तुम्ही स्वत: शेतकरी व्हायचं.
अप्पा : (त्या कल्पनेने सुखावून) वा! सुंदर कल्पना आहे. उमाठ्यावर सोनसडा झाला की मी बैल घेऊन शेतावर जाईन आकाशातल्या केशरकस्तुरीचा आस्वाद घेत. मी स्टेजवर कधी गाणी म्हटली नाहीत. पण विहीरीवर मोट चालवताना म्हणेन. ते नाही जमलं तर नाटकातील भाषणं म्हणेनं. मोटा चालवीन, नांगर धरीन. काय वाटेल ते करीन, आणि मग सूर्य माथ्याला आल्यावर बांधाच्या पायवाटेनं तू माझी भाकरी घेऊन येतील. मात्र सांगून ठेवतो, तू स्वत: यायला हवंस. गड्यामाणसाला पाठवलं तर विहीरीमध्ये ढकलून देईन त्याला. माझा राग कठीण असतो, ठाऊक आहे तुला.
कावेरी : (हसत) येईन, येईन. मीच येईन.
अप्पा : आणि हे पाहा, तुला वृंदावन हवं तसं मला थिएटर हवं. बाहेरच्या

Scanned with CamScanner

पडवीला आपण थिएटर म्हणायचं. तिथं मी नाटकाला पुस्तकं ठेवीन आणि मला वाटेल तेव्हा मोठमोठ्यान भाषण म्हणत बसेन. चालेल? मग कटकट करायची नाही, की कानठळ्या बसतात म्हणून कुरकुर करायची नाही.

कावेरी : नाही करणार.

अप्पा : रामची शेलार, सयाजी शेलार, गंगाराम जागले, महादेव कोळी – सगळ्यांना खूप आनंद वाटेल. पारावरच्या बैठकी पुन्हा फुलून येतील. मनाला, शरीराला काचणारे हे सगळे साखळदंड तुटतील आणि आपण मोकळे होऊ. खूप मोकळे होऊ कावेरी. कावेरी –

कावेरी – इश्श! इतक्या मोठ्यानं काय हाका मारायच्या ? कुणी ऐकलं तर काय म्हणतील?

अप्पा : म्हणतील की म्हाताऱ्याला आपल्या बायकोचं नाव अजून आठवतंय – (जवळ जाऊन तिचा हात हातात घेतात) कावेरी, गेल्या पन्नाससाठ वर्षात एक गोष्ट तुला सांगायची मी विसरून गेलो, आता सांगणार आहे ती.

कावेरी : कोणती ती!

अप्पा : तू मला फार आवडतेस. मी खूप खूप प्रेम करतो तुझ्यावर.

कावेरी : (सुखावत हसत) इश्श! या गोष्टी बोलायच्या असतात का? आणि हे काय मला माहीत नव्हतं ?

अप्पा : तरीही एकदा सांगांवस वाटतं.

कावेरी : (स्मित करीत) मला सवती किती होत्या !

अप्पा : (हसतात) बापरे ! आठवणीच्या मावळतीवर हे जुने जमाखर्च आता कसे लक्षात घेणार? पण तुला एक सांगतो, कावेरी, तुला सवत कुणीही नव्हती. होत्या त्या फक्त माझ्या मैत्रिणी होत्या.

कावेरी : मी मैत्रीण नव्हते ?

अप्पा : तू बायको होतीस?

कावेरी : बायको मैत्रीण असू शकत नाही?

अप्पा : असू शकते, असतेही; पण मैत्रिणीपेक्षा आई अधिक असते. दिवाणखाना

Scanned with CamScanner

कमी असतो, पण देऊळ जास्त असते. आकाश कमी असते, पण पृथ्वी अधिक असते. थोडक्यात, बायको हे एक बंदर असत कावेरी, नवरा नावाच्या गलबतासाठी.

कावेरी : फारच दुर्घट विषय दिसतोय !

अप्पा : गलबत शिडं उभारून सातासमुद्रात मुशाफरी करायला बाहेर पडतं. हे समुद्र असतात व्यवहाराचे, कलेचे, ध्येयाचे, प्रेमाचे आणि व्देषाचेही. या दर्यात शिरावं, दूरवरचं किनारे पहावे, वादळवाऱ्याशी मुकाबला करावा, चंद्रचांदण्यांशी सोयरीक करावी. संतप्त लाटांची मस्ती अंगावर घ्यावी. जगणं असं असावं की पावला पावलावर मरणाशी मुलाखत व्हावी. परंतु हे सारे उद्रेक अंगावर घेताना गलबत सतत पाहात असतं आपल्या बंदराकडे. पराभवाच्या जखमा किंवा विजयाचे झेंडे घेऊन ते पुन्हा बंदरात येतं आणि तेथील हिरव्या निळ्या प्रकाशात, प्रशान्त पाण्याच्या गालिच्यावर विश्रांती होतं. गलबताच्या पराक्रमाचा उदय बंदरात होतो. पराजयाचे सांत्वनही त्याला बंदरातच मिळतं. अशी आहे बंदराची महती. म्हणजे बायकोची. म्हणजेच तुझी.

कावेरी : (हसत) महती चांगली आहे. पण खरं सांगा. अजून मेनकाताईची आठवण होते?

अप्पा : अनेक जखमांतील तीही एक जखमच. आणि ती जखमही मी माझ्या बंदरातच घेऊन आलो. तिथेच मरून निघाली ती.

कावेरी : (मोकळेपणाने हसते) तुमच उत्तर मला माहीत होतं. एकदा विचारून टाकायचं होतं, इतकंच. मनात काही रूखरूख राहायला नको. सगळी गाठोडी इथं ठेवून मोकळ्या मनानं पालखीत बसता आलं पाहिजे.

अप्पा : माझ्या आधी?

कावेरी : सोन होईल माझं.

कावेरी : (हसते) जाऊ दे. उगाच गंमत केली मी !मी काही एवढ्यात जात नाही अन् कुणाला जाऊ देणार नाही. पण मोरवाडीला जायचं हे नक्की ठरलं ना?

अप्पा : ठरलं- ठरलं- ठरलं!

(विठोबा औषधाच्या बाटल्या, ग्लास, इत्यादी घेऊन आत येतो.)

Scanned with CamScanner

विठोबा : शपथ वाहा – शपथ वाहा – शपथ वाहा.

अप्पा : (अनवधानाने) हो, हो, शपथ वाहतो. मी मोरवाडीला जाईन.

विठोबा : मोरवाडीला की चोरवाडीला?

अप्पा : (वळून) गधड्या!

विठोबा : आम्हालाही विटा करता येतात, अप्पासाहेब. लहानपणीच गडकऱ्यांची सावली माझ्या डोक्यावर पडली होती. समर्थ मंडळीत तर लोक मला विठोबाच्याऐवजी विठोबाच म्हणायचे.

अप्पा : मूर्खा, अशा कोट्या करायला हे काय नाटककंपीनचे स्वयंपाकघर आहे?

विठोबा : अप्पासाहेब, नाटकवाल्यांची दुनिया म्हणजे कलंदराची दुनिया, पण नाटक कंपनीच्या स्वयंपाकघरात जेवढा सभ्यपणा होता तेवढा या सभ्य लोकांच्या दिवाणखान्यातही सापडायचा नाही. – ही औषध घ्या. हे थोरल्या बाईसाहेबांचं, हे तुमचं. आम्ही पुन्हा शपथा घ्यायला जातो की आम्ही चोर नाही म्हणून.

अप्पा : अरे पण गाढवा –

विठोबा : (परत जाताना पुन्हा मागे वळून) अप्पासाहेब, मी आयुष्यात कसली चोरी केली असेल तर ती फक्त नाटककारांच्या शब्दांची, बस. याच्या पलीकडे

अप्पा : अरे, पण तू चोरी केली असं कोण म्हणतंय?

विठोबा : केली आहे असं कोणी म्हणत नाही, पण केली नाही असंही कोणी म्हणत नाही. जातो मी, बाईसाहेब येताहेत.

(नलू आणि सुधाकर आत येतात.)

नलू : विठोबा, इथं गप्पा मारीत उभा राहिलास ! हे बघ, अस्साच लॉंड्रीमध्ये जा, साहेबांचे कपडे आण आणि सूटकेस नेहमीसारखी भरून ठेव.

विठोबा : जी, बाईसाहेब (जातो.)

अप्पा : किती दिवसांनी येतंय माझं लाडक कोकरू इकडे. नले, आज एक गंमत सांगणार आहोत आम्ही तुम्हाला.

नलू : आज तुम्ही फिरायला गेला नाहीत, अप्पा !

अप्पा : नाही गेलो, तुझ्या आईला अधूनमधून लहर येते प्रेमाचे संवाद करण्याची

Scanned with CamScanner

मग बसावं लागतं आणि हातात हात घेऊन काहीतरी गुलकंदी बोलणं करावं लागतं.

कावेरी : भलतंच काय सांगता? अगबाई, साहेबही आले आहेत. मी पाहिलंच नाही. (उठायचा प्रयत्न करते. )

सुधाकर : आपण उठू नका. हालचाल करायला सक्त मनाई आहे अजून.

कावेरी : उठत नाही. जरा टेकून बसते उशाला. अहो, जरा हात देता का?

नलू : थांबा, अप्पा, मी धरते तिला. (कावेरीला हात देते)

कावेरी : नले, पाचसहा दिवसात फिरकली नाहीत इकडे. आणि जावई तर – मला वाटतं –

नलू : आई, आमची काय धांदल चालते, तुम्हाला दिसत नाही का? गेल्या आठ दिवसांत दहा पाहुणे येऊन गेले. घरातल्या कामाचा रामरगाडा आणि त्यात हे बाहेरचे उदयोग. जीव नकोसा होऊन जातो.

अप्पा : अगं पोरी, आपल्या देशातलं एक मोठं धरण बांधतोय तुझा नवरा. त्याच्या हाताबरोबर तुझाही हात लागतोय त्या बांधकामाला. जावई, म्युनिसिपालीटीच्या वीतभर पुतळ्याखाली मेंबरलोकांची हातभर यादी असते. तशी यादी धरणावर देतात का?

सुधाकर : (हसून) अद्याप तरी तशी पध्दत नाही.

अप्पा : सुरू झाली तर तुमच्या नावाबरोबर कंसामध्ये या जगदंबेचही नाव घालायला सांगा.

नलू : (कपाटात शोध घेत) अप्पा, – जरा –

अप्पा : काय शोधते आहेस बेटा, त्या कपाटात ? आमचा कळकट मळकट संसार भरलेला आहे त्यात. उगाच अंगावर धूळ घेऊ नकोस. काही हरवलंय का?

नलू : माझ्या विणायच्या सुया सकाळपासून सापडत नाहीत. सारं घर शोधते आहे. उदया सकाळी आम्हाला नाशिकला जायचं आहे. येता-जाता त्यांचा स्कार्फ पुरा करून टाकील म्हटलं. तुम्हाला सांगावं आणि सुयाही सापडतात का

Scanned with CamScanner

पाहावं.

अप्पा : नाशिकला जाणार ? अन् परत केव्हा येणार ?

सुधाकर : दोन दिवसांनी. आमच्या डिव्हिजनल इंजिनियर्सची बैठक आहे तिथे.

अप्पा : आणि आमची गाठोडी?

नलू : विठोबा करील सगळं व्यवस्थित. त्याला सांगून ठेवलंय.

अप्पा : आम्ही घरात कुठेही हिंडायला हरकत नाही ना?

नलू : इश्श, हे काय अप्पा ? तुम्हाला कोणी मनाई केली आहे ? हो– खरचं – आज दुपारी तुम्ही तिकडे हॉलमध्ये पेपर वाचीत बसला होता ना?

अप्पा : हो, जगात काय घडतयं, जरा पाहायला हवं.

नलू : आई, तुझी ट्रंक इथं खाली आहे ना? परवा मी तुझे कपडे पाठवले तेव्हा एखादवेळी सुयाही गेल्या असतील चुकुन त्यात. तुझ्याजवळ किल्ली आहे?

अप्पा : अंग किल्ल्या हरवलेली कुलपं आमची. थोडं ओढलंस तर कुलूपच काय, पण कडीही बाहेर येईल. मी काढू का ट्रंक बाहेर?

नलू – नको, इथंच पाहते मी. (कॉटजवळ बसून ट्रंक पुढे ओढते.)

सुधाकर – (अस्वस्थ होऊन) राहू दे नलू – मला वाटतं–

नलू : (ट्रंक उघडीत) राहू दे काय? एकदा मनाची खात्री करून घ्यायला हवी काय काय भरलंय आई, ट्रंकमध्ये ?

अप्पा : जावई, तुमची बायको म्हणजे आठवणीची खंदक आहे. लहानपणापासूनच काहीतरी हरवायचं आणि नंतर शोधायचं यात आजवरचं निम्म आयुष्य गेलं असेल तिच. – अगं सापडताहेत का? कशाला उगाच उचकत बसलीस? नाही ना?

नलू : (ट्रंक लावून आत लोटीत) नाही, सुया नाहीत.

अप्पा : मग आणखी काय हरवलंय?

नलू : काही नाही, सुयाच. तिकडेच असतील कुठंतरी. चला –

अप्पा : पहाटे निघणार ?

नलू : हो, आई, कडक थंडी पडणार म्हणून इशाला आला आहे आज. आणखी

Scanned with CamScanner

एक ब्लँकेट मी आणून ठेवते थोड्या वेळानं.

(नलू – सुधाकर जातात. )

अप्पा : (आराम खुर्चीवर बसतात.) सुया सापडत नाहीत. म्हणून फारच कासावीस झालेली दिसते कारटी. पण या ट्रंकेत कशाला येतील त्या?

कावेरी : अहो वस्तू हरवली म्हणजे वेडापिसा जीव होतो बायकांचा. आपला मोरवाडीचा बेत तुम्ही त्यांना सांगणार होता?

अप्पा : हो. पण या सुयांच्या दंगलीत आठवणच राहिली नाही.

कावेरी : बरं झालं. नाही सांगितलं. बाहेरगावी जाताना डोक्याला शीण नको पोरीच्या हवा आताच गार पडायला लागली आहे !

अप्पा : शालू घालू अंगावर !

कावेरी : माझ्यासाठी म्हणत नाही मी. जरा इकडे या. तुमचा स्वेटर मी कपाटातून काढून देते.

अप्पा : मी काढून शोधतो. तुम्हाला डॉक्टरनं–

कावेरी : पुरे झालं कौतुक. डॉक्टरांचा सगळंच सांगणं इतकं मनावर घ्यायचं नसतं. कपड्यांच्या गाठोड्यात बांधून ठेवलाय स्वेटर. तुम्हाला सापडायचा नाही तो.

अप्पा : स्वेटर सापडेल बिचारा. पण गाठोडं विसकटण्याची धास्ती वाटते आहे तुम्हाला. ठीक आहे. – काठी देऊ?

हात द्या फक्त.

(अप्पांच्या सहाय्याने कावेरी उठते आणि कपाटापाशी जाऊन स्वेटकर काढू लागते. )

कावेरी : आणि ते औषध घेऊन टाका अगोदर. अशी टंगळमंगळ चालायची नाही. घ्या आधी.

अप्पा : हो – हो – घेतो, सरकार.

(औषध घेतो.)

कावेरी : (स्वेटर बाहेर काढून कपाट लावते.) हा घ्या स्वेटर. आणि आता अंगात

Scanned with CamScanner

घाला.

अप्पा : (स्वेटर घेऊन) मोरवाडीच्या नव्या संसाराची ही तालीम दिसते. पण सरकार मला थंडी वाचत नाही इतकी !

कावेरी : घाला म्हणते ना! अन् हात द्या जरा –

(कॉटवर जाऊन बसते)

अप्पा : कावेरी, हा स्वेटर तू केव्हा पुरा केलास आठवतंय?

कावेरी : हो.

अप्पा : त्या दिवशी मुंबईला माझा सत्कार झाला होता. रसिकांनी मला थैली दिली. नटसम्राट ही पदवी दिली. आणि त्याच दिवशी रात्री तू हा स्वेटर माझ्या अंगात घातलास. त्या वेळी काय गंमत झाली, तुला आठवतंय?

कावेरी : (हसून मान फिरवतेस) इश्श! ते कशाला सांगायचं सगळं.

अप्पा : आपण तेव्हाही म्हातारे होतो पण आजच्याइतके नाही. पिवळ्या पानाला थोडी हिरवी किनार होती. मी म्हटलं, त्या थैलीपेक्षा आणि पदवीपेक्षा या स्वेटरचं सुख मला जास्त वाटतं. मी तुला जवळ ओढलं –

कावेरी : पुरे ना आता !

अप्पा : त्या समाधीत किती वेळ गेला कुणास ठाऊक. ती उतारवयाच्या आतच डॉक्टरांची सिंहगर्जना कानावर आली – अप्पासाहेब, रंगभुमीचे हे राजेरजवाडे तुम्हाला तुम्हाला भेटायला आले आहेत. समोर पाहतो तो केशवराव, नानासाहेब, गणपतराव अशी खाशी मंडळी दाराजवळ उभी – हातात हारतुरे घेऊन. आणि इकडे आमची काय अवस्था–

कावेरी : नको ना.

अप्पा : स्वेटरमध्ये अडकलेली तुझ्या कर्णफुलाची कडी काही लौकर सुटेना. सगळी मंडळी हसत होती. मस्करी करीत होती. शेवटी डॉक्टरांनी पुढे होऊन हल्क्या हातानं ऑपरेशन केलं आणि आपली सुटका केली. (दोघेही हसतात.) मारुतीप्रमाणे जन्मल्याबरोबर असा पराक्रम केला आहे या स्वेटरनं. पण तोही बिचारा आता जर्जर झाला आई मालकासारखा.

Scanned with CamScanner

कावेरी : मोरवाडीला गेल्यावर मी नवा स्वेटर करायला घालीन.

अप्पा : (स्वेटर घालून) नक्की?

कावेरी : हो, हो, घेईन

अप्पा : (नाटकी स्वरात) शपथ वाहा – शपथ वाहा – शपथ वाहा!

(दोघेही हसतात. त्याच वेळी विठोबा प्रवेश करतो.)

विठोबा : वाहवा ! असं ट्रेनिंग जमलं तर स्वत:लाच नव्हे तर नाटकालाही बक्षीस मिळवून देईन मी. जमेल केव्हातरी. अप्पासाहेब, हे तुमचे कपडे. धोब्यानं साहेबाच्या कपड्याबरोबर तुमचेही कपडे दिले. बाईसाहेबांनी सांगितलं, स्वत:च्या हातानं कपाटात ठेवून दे.

अप्पा : मघाची भांग उतरली वाटतं?

विठोबा : (कपाटात कपडे ठेवीत) जी चढलीच नाही ती उतरण्याचा सवालच निर्माण होत नाही, अप्पासाहेब. माझं डोकं चढलं होतं चोरीच्या आरोपीमुळे.

अप्पा : चोरीचा आरोप ? कसली चोरी झाली? कोणावर चोरीचा आळ आला?

विठोबा : (माघारी येत) आज आमच्यावर आला, उदया कोणावरही येईल.

अप्पा : गाढवा, नीट सांगणार आहेस का?

कावेरी : कुणाची चोरी झाली, विठोबा?

विठोबा : कोणाशी बोलायचं नाही म्हणून बाईसाहेबांनी बजावलंय. पण तुम्हाला म्हणून सांगतो. फार वाईट गोष्ट आपल्या घरात घडली आज.

अप्पा : काय झालं ?

विठोबा : साहेबांचा सगळा पगार आज दुपारी चोरीला गेला.

अप्पा : पगार ? चोरीला गेला?

कावेरी : पगार ? चोरीला गेला?

विठोबा : साहेब दुपारी जेवायला आले तेव्हा गोदरेजच्या कपाटात त्यांनी पाकीट ठेवलं होतं. संध्याकाळी येऊन पाहतात तो पाकीट गायब.

अप्पा : गायब !

विठोबा : साफ गायब ! सगळीकडे बाईसाहेबांनी शोध घेतला. सगळ्या नोकर

Scanned with CamScanner

माणसांवर आरोप केले, जबान्या घेतल्या, झडत्या घेतल्या. पण काहीही पत्ता लागला नाही म्हणून म्हटलं तुम्ही मोरवाडीला जायला निघालात तरी लोक तुम्हाला चोरवाडीला नेऊन पोहचवतील. जातो मी. बॅग भरायची आहे.

(विठोबा जातो. अप्पा एखाद्या पुतळ्याप्रमाणे, कोणीतरी ढकलल्यागत खुर्चीवर जाऊन बसतात. )

कावेरी : किती धांदरट माणसं आहेत ही! दारं उघडी टाकली असतील, कुणीतरी आत शिरलं असेल –

अप्पा : (ओरडतात) सरकार ! तेवढयासाठी आपल्या खोलीचा शोध घेतला तिनं? सरकार आपण चोरी केली, मी चोरी केली ! आपण आज चोर ठरलो, कावेरी!

कावेरी : मी म्हणते, उगाच असा वेडावाकडा कयास करू नये, असं व्हायचं नाही. (नलू ब्लँकेट घेऊन आत येते. दोघेजण एकदम स्तब्ध होतात. नलू कावेरीच्या पायथ्याशी ब्लँकेट ठेवते, आणि विचारते :)

नलू : अंगावर घालू ?

कावेरी : नको !

(नलू कोणाकडे न पाहता जाऊ लागते.)

अप्पा : (उठून) नले, मी – मी– चोरी केली असा संशय आला तुला?

नलू : (उभी राहते, शांतपणाने) हो.

कावेरी : नले !

अप्पा : तेवढ्यासाठी तू कपाट आणि ट्रंक शोधलीस?

नलू : हो तेवढ्याचसाठी.

अप्पा : (एकदम उद्ध्वस्त झाल्याप्रमाणे) नाही ! शक्य नाही! माझ्या लाडक्या कोकरा, खोटं सांग. नले. मला सहन होणार नाही! खोटं सांग, पण नाही म्हणून सांग –

मला : मला खोटं बोलायची सवय नाही.

अप्पा : मी चोरी केली असं खरचं वाटतं तुला?

Scanned with CamScanner

नलू : (संताप दाबून) अप्पा, मी बेलवलकर नाही, कार्लेकर आहे. त्यांचे पैसे होते ते. ते असे कपाटातून काढून घेण्याचा तुम्हांला काहीही अधिकार नव्हता. पैसे हवे होते तर माझ्यापाशी मागायचे होते. चोरी करून तुमचं आणि माझंही तोंड काळं केलंत तुम्ही.

अप्पा : मी चोरले पैसे? चांडाळणी!

कावेरी : माझं ऐकायचं. असं रागवायचं नाही.

अप्पा : रागवायचं नाही ? पृथ्वीवर गाफीलपणानं हिंडणाऱ्या परमेश्वराच्या पाठीत सुरा खुपसून त्याचा खून करू पाहणारी माणसं समोर वावरत असताना रागवायचं नाही? मी पैसे चोरले? सरकार, तिला माहीत आहे, माझ्या क्रोधाला पाय नाहीत, हात नाहीत, लुळापांगला आहे तो; वडाऱ्यांनी अर्धवट चिरलेल्या डुकराचं धड नुसतं. गटारात तडफडणारं. मी पैसे चोरले ? नाही. सरकार, मी रागवणार नाही. काय उपयोग आहे त्याचा ? मी रागवणार नाही. पण तुम्हाला सांगून ठेवतो, मी रडणारही नाही. डोळ्यांत आसवं जमायला लागली तर खिळे मारून डोळ्यांचा खाचा करीन संभाजीसारख्या. पण तुझ्यासारख्या आळईसमोर रडणार नाही. मी पैसे चोरले? मी पैसे चोरले?

नलू : (बेभान होऊन किंचाळत) हो – तुम्ही चोरले ! तुम्ही चोरले ! तुम्ही चोरले!

(हाताने डोके दाबून आवेगाने बाहेर निघून जाते.

कावेरी नले, नले म्हणत धडपडत उठते आणि तिच्या मागोमाग जाऊन शेवटी भिंतीचा आधार घेऊन उभी राहते.

अप्पासाहेब क्षणभर निश्चल उभे राहतात, नंतर भ्रमातल्या माणसाप्रमाणे हेलकावणाऱ्या अस्थिर पावलांनी खुर्चीकडे जातात, क्षणभर पाठीच्या आधाराने उभे राहतात व नंतर खुर्चीवर बसतात.)

अप्पा : मी चोर आहे! (छातीवर हात आदळत) मी चोर आहे! मी अप्पा बेलवलकर– नटसम्राट – लक्षावधीची मालमत्ता गुलाल– बुक्याप्रमाणे ज्यानं उधळून दिली तो हा गणपतराव बेलवलकर चोर ठरला – आपल्या पोरांच्या

घरामध्ये ! परमेश्वरा, मी इतक सारं काही सहन केलं असतं– पण हे

कावेरी : (भिंतीचा, कॉटचा आधार घेत त्यांच्या जवळ येते आणि खांद्यावर हात ठेवते) ऐकलत का?

अप्पा : (क्षीण स्वरात) काय म्हणतेस?

कावेरी : सगळी दुनिया आपल्यासाठी संपली आहे आता. आपण दोघंच उरलो आहोत. आपण दोघंच. एकमेकांसाठी. माझ्या गळ्याची शपथ आहे. मी सांगते ते ऐकायचं.

अप्पा : (जमिनीकडे नजर खिळवून) मला काहीच समजत नाही, सरकार.

कावेरी: माझ्या काळजाच्या चिंध्या होताहेत. पण मी जगणार आहे. तुमच्यासाी मी बरी असते तर एक क्षणभरही हे सहन केलं नसतं. नंदाच्या घरून बाहेर पडले तशी तुम्हाला घेऊन या क्षणाला बाहेर पडले असते. पण या आजारामुळे मी अगतिक झाले आहे. लाचार झाले आहे. मला माझा भरवसा वाटत नाही. म्हणून सांगते –ऐकताहात ना? आजची रात्र आपण इथे काढू. कोणाला तरी बरोबर घेऊन उद्या सकाळीच आपण मोरवाडीला जाऊ. मी बंगल्यात नलूकडे जाऊन येते. एकदा तिला स्पष्ट विचारते. काय तुझ्या मनात आहे म्हणून. आम्ही घर सोडायला तयार आहोत. पण असा अभद्र शिक्का आमच्या कपाळावर मारू नकोस.. मी पायांवर डोकं ठेवून तिची विनवणी करीन. – बये, तुझ्याजवळ कधी काही मागितलं नाही. पुढेही मागणार नाही. पण आज पदर पसरते तुझ्यापुढे. एखादा माणूस आमच्याबरोबर दे आणि आम्हाला मोरवाडीपर्यंत पोचविण्याची व्यवस्था कर. आम्ही आमची थेरडी थोबाडं तुझ्या संसारात पुन्हा कधीही दाखवणार नाही. पण तुम्ही शांत बसायतं इथं ! माझी शपथ आहे. डोकं फिरवून घ्यायचं नाही. मला थोडं बरं वाटलं ना, म्हणजे मी वाटेल तेवढे आयाससायास करीन. मोरवाडीला गेल्यावर सुखासमाधानाचं देऊन उभं करीन असंच मी समजते. आपली साथ आहे तोपर्यंत कशाचीही पर्वा नाही मला. मी मनानं खचले नाही. तुमच्या हाताचा आधार मिळाला तर कुठलाही वादळवाऱ्यात दगडासारखी उभी राहीन. कुठल्याही काळोख्यातून तुमच्यासाठी रस्ता काढीन. पण – माझं एवढं

ऐकायचं– तुम्ही शांत राहायला हवं– ऐकाल ना?

अप्पा : ऐकेन

कावेरी : मी आत जाऊन येते.

अप्पा : पण कावेरी, तुला –

कावेरी : भिंतीचा आधार देत जाईन मी. माझी काळजी करू नका. आता येते मी. मला समजलंच पाहिजे.

(कावेरी हलके हलके भिंतीच्या आधाराने आत जाते. अप्पासाहेबांची नजर अद्याप जमिनीशी जखडलेली आहे. )

अप्पा : कशासाठी जगतो आहोत आम्ही !

(अंधार पडतो. फक्त अप्पांवर एक प्रकाशझोत जळत राहतो. )

अप्पा : (पुढे जाऊन)

जगावं की मरावं<br>
हा एकच सवाल आहे.<br>
या दुनियेच्या उकिरड्यावर<br>
खरकट्या पत्रावळीचा तुकडा होऊन<br>
जगावं बेशरम लाचार आनंदानं<br>
की फेकून द्यावं हे देहाचं लक्तर<br>
त्यात गुंडाळल्या जाणिवेच्या यातनेसह<br>
मृत्यूच्या काळ्याशार डोहामध्ये?<br>
आणि करावा सर्वांचा शेवट<br>
एकाच प्रहारानं<br>
माझा तुझा याचा अणि त्याचाही.<br>
मृत्यूच्या महासर्पानं<br>
जीवनाला असा डंख मारावा<br>
की नंतर येण्याऱ्या निद्रेला<br>
नसावा जागृतीचा किनारा

Scanned with CamScanner

कधीही
पण त्या निद्रेला
पुन्हा स्वप्न पडू लागलं तर
तर– तर
इथंच मेख आहे.
नव्या स्वप्नाच्या अनोळखी प्रदेशात
प्रवेश करण्याचा धीर होत नाही
म्हणून आम्ही सहन करतो
हे जुनं जागेपण
सहन करतो प्रेताच्या निर्जीवपणानं
अभिमानावर होणारे बलात्कार
अस्तित्वाच्या गाभाऱ्यात असलेल्या सत्वाची विटंबना
आणि अखेर करूणेचा कटोरा घेऊन
उभे राहतो खालच्या मानेने
आमच्या मारेकऱ्यांच्याच दाराशी.
विधात्या, तू इतका कठोर का झालास
एका बाजूला, आम्ही ज्यांना जन्म दिला
ते आम्हाला विसरतात
आणि दुसऱ्या बाजूला, ज्यानं आम्हाला जन्म दिला
तो तूही आम्हाला विसरतोस,
मग विस्कटलेल्या हाडांचे हे सापळे घेऊन
हे करूणाकरा,
आम्ही थेरड्यांनी
कोणाच्या पायावर डोकं आदळायचं!
कोणाच्या– पायांवर – कोणाच्या
(खुर्चीवर बसतात, शेवटच्या शब्दांबरोबर काळोख नाहीसा होतो. अप्पा खुर्चीवर

Scanned with CamScanner

हरवलेपणाने बसले आहेत. नलू मान खाली घालून दाराजवळ उभी आहे, कावेरी बिछान्यावर कडेवर हताशपणाने टेकलेली आहे आणि सुधाकर पलीकडच्या खिडकीतून शून्य नजरेने बाहेर पाहात आहेत - असं हृदय प्रकाशात प्रगट होते. एक दीर्घ शब्दविराम. गळचेपी करणारी स्तब्धता.)

कावेरी : (अगतिकतेने) माझं एकदा ऐकायचं–

अप्पा : काय सांगणार आहेस?

कावेरी : मुलीचा गैरसमज झाला. पाकीट कपाटातच सापडलं. आत्ता एवढ्यात. पण पोरीचा जीव बावरून गेला होता. आपले हाराचे पैसे ट्रंकमध्ये होते. तिला या पैशाचं काहीच माहीत नव्हतं. तिला वाटलं–

अप्पा : (उफाळून) आपला बाप चोर आहे. आपली आई चोर आहे आणि मुख्य म्हणजे ती दोघं म्हातारडी आहेत, लुळीपांगळी आहेत, बेवारशी कुत्र्याप्रमाणे आपल्या आश्रयाला येऊन राहिलेली आहेत. त्यांच्या तोंडावर हे गलिच्छ आरोपाचं शेण फेकलं तर ते काय आपलं करणार आहेत? सरकार, या दीडदमडीच्या कठपुतळ्यांना न्यायासनावर बसवून त्यांच्यासमोर इन्साफ मागण्याचीच नव्हे तर निरपराधी ठरण्याची देखील माझी इच्छा नाही. कारटे, मराठी रंगभूमीचा हा सार्वभौम राजा नटसम्राट गणपतराव बेलवणकर, गणपतराव जोश्यांचा पट्टशिष्य, खाडिलकर– गडकऱ्यांसारख्या दैवतांनी ज्याच्या पाठीवर हात ठेवला असा कलावंत, लक्षावधी रसिकांच्या आशिर्वादामुळे कुबेरा  श्रीमंत आणि इंद्रापेक्षा भाग्यवान झालेला रंगदेवतेचा पुजारी - त्याची तू अशी विटंबना करतेस? तो तुझा बाप झाला म्हणून? त्याच्याजवळ पैसे नाहीत म्हणून? म्हातारपणानं तो असहाय झाला म्हणून ?

नलू : (धावत जाऊन त्याच्या पायावर हात ठेवले) अप्पा, मी चुकले! मला क्षमा करा, अप्पा तुमच्या लाडक्या कोकराला क्षमा करा!

अप्पा : (बाजूला जाऊन) खबरदार, चांडाळणी, त्या शब्दांचा उच्चार करशील तर! माझं एक लाडकं कोकरू होतं - होतं पण आता कुठं आहे ते ! माझा भ्र होता तो. गोजिरवाण्या कोकरासारखी एक मुलगी होती. एक सशासारखा मुलगा

Scanned with CamScanner

होता पण खरं म्हणजे ते माझे कोणीच नव्हते. आभाळ पाठीवर घेणाऱ्या हत्तींना विचारून पाहा. ते सांगतील. कोणीही कोणाचं नसतं. अंतराळात भटकणारा एखादा आत्मा आमच्या वासनेच्या जिन्यानं पृथ्वीवरच्या मातीत उतरतो आणि आम्हाला वाटतं की आम्ही बाप झालो – आई झालो. पण खोटं, सगळं खोटं. आपण फक्त जिने असतो. फक्त जिने ! (खुर्चीवर कोसळतात)

सुधाकर : अप्पासाहेब, माझी विनंती आहे आपल्याला, आपण –

कावेरी : (उठून अप्पांकडे येण्याचा प्रयत्न करते.) मी काय म्हणते – माझं एकदा ऐकायचं – मला आता हे सहन होत नाही – छातीत कळ येते आहे– पण – आजची रात्र आपण – इथं काढायला हवी. उद्या सकाळीच आपण – मोरवाडीला जाऊ – मी तिथं तुमच्यासाठी – आई गं !

(छातीत असह्य कळ येून जमिनीवर आई ग !

नलू : आई ! (धावते)

अप्पा : सरकार ! सरकार ! –

(तिच्याकडे धावत जातात.)

Scanned with CamScanner